**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१३३** **दिनांक : १८/०३/२०२५**
**विभाग** : मार्केट विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** सकाळ पुस्तक महोत्सव २०२५ प्रायोजकत्वाची रक्कम देणे बाबत..

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,प्रकाश पाटील,सहसंपादक,सकाळ माध्यम समूह,अहिल्यानगर यांनी पत्र देवून कळविले आहे की,सकाळ माध्यम समूहाच्या सहकार्याने पुणे येथे सकाळ पुस्तक महोत्सव आयोजित होत असतो. या महोत्सवास वाचक भरभरून प्रतिसाद देतात. वाचकांच्या मागणीनुसार प्रथमच दैनिक सकाळच्या वतीने अहिल्यानगर येथे (दि.२१ मार्च ते २४ मार्च २०२५) या कालावधीमध्ये पुस्तक महोत्सवाचे भव्य स्वरूपात आयोजन करण्यात येत आहे. महोत्सवाला मोठा खर्च अपेक्षित आहे.

सदरचा महोत्सव सकाळ आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त विदयमाने होत आहे. तरी या पुस्तक महोत्सवासाठी रू.२०,००,०००/- (वीस लाख फक्त कर व्यतिरीक्त) आर्थिक प्रायोजकत्व उपलब्ध करून दयावे अशी विनंती केली आहे.

सुंदर महोत्सवामुळे अहिल्यानगर शहराचे नांव राज्यात आणि देशात आणखी उंचावेल, याची आम्हाला खात्री वाटते आशाबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार सदर कलमात नमुद केलेल्या बाबीसाठी किंवा अन्य कोणत्याही बाबी साठी तरतुद करता येईल. अधिनियमातील कलम ६६(४१) मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे. "कोणतेही सार्वजनिक स्वागत समारंभ किंवा करमणुकीचे कार्यक्रमासाठी कोणतेही अंशदान देणे"

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये "सामाजिक संस्थांना देणगी" या लेखाशिर्ष अंतर्गत रक्कम रू.५ लाक्ष तरतुद वाढविणे कामी सन २०२४-२५ चे सुधारीत पुर्नविनीयोजन अंदाजपत्रकात तरतुद करण्यात यावी.सद्यस्थितीत सदर लेखाशिर्षात शिल्लक रक्कम रू.५ लक्ष अदा करणेस व उर्वरित रू.५ लक्ष तरतुदीमध्ये वाढ केल्यानंतर अदाकरणेस अशी एकुण रक्कम रूपये १०.००लाख सकाळ पुस्तक महोत्सव २०२५ साठी देणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजुरी देत आहे.

---

निर्णय :- महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१३४** **दिनांक : १८/०३/२०२५**
**विभाग** : अर्थ विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** महानगरपालिका,नगरपालिका ,नगरपारिषदा मधिल कर्मचा-यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनातील नियम लागू करणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहमदनगर महानगरपालिकेत दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत रूजू झालेल्या कर्मचा-यांच्या महा.शासन वित्त विभाग शा.नि.क्र. अंतियो १००/१२६/सेवा-४ मंत्रालय , मुंबई दि. ३१ ऑक्टोबर २००५ च्या परिपत्रका नुसार त्यांच्या वेतनातून मुळ वेतन व महागाई भत्ता या रकमेचा १० टक्के रक्कम कपात करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.नि.क्र. अंतियो - २०१९/ २६६/सेवा-४ मंत्रालय , मुंबई दि. १९ ऑगस्ट २०१९ च्या परिपत्रका नुसार कर्मचा-यांच्या मुळ वेतन अधिक महागाई भत्ता एकूण रक्कमेच्या १४ टक्के रक्कम महानगरपालिकेचा हिस्सा त्यांच्या खात्यात जमा करण्यात येत आहे.

शासन निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिकेतील दि. १ नोव्हेंबर २००५ नंतर सेवेत रूजू झालेल्या कर्मचा-यांना मा. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक :रानियो-२०२२/प्र.क्र.३४/सेवा-४ दि. ३१ मार्च २०२३ चे परिपत्रकानुसार शासन निर्णयाच्या दिनांकापासून ज्या कर्मचा-यांनी विकल्प दिलेल्या आहे अशा कर्मचा-यांना त्यांच्या विकल्पानुसार आर्थिक लाभ देण्याबाबतचा प्रस्ताव लेखा विभागाने सादर केला परंतु सदर योजने बाबत मा.शासनाने अजून काही शासन निर्णय दिलेले आहेत यासह सविस्तर एकत्रित सुधारित प्रस्ताव मा.प्रशासकीय महासभेपुढे फेर सादर करण्यात यावा. यास मा.प्रशासकीय सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.असा ठराव दिनांक १८/०७/२०२४ रोजी पारित झाला होता.विभागाने फेरसादर नुसार,महाराष्ट्र शासनाने दि.३१ मार्च २०२३ नंतर आर्थिक लाभ देण्याबाबत पडताळणी केली असता परिपत्रक पारित झालेले आढळून येत नाही. त्यानुसार महानगरपालिके मधिल कर्मचा-यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजनातील नियम लागू करण्यास मा.प्रशासक महासभेची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१३५** **दिनांक : १८/०३/२०२५**
**विभाग** : मार्केट विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी झोन निहाय खाजगी करणाच्या माध्यमातुन expression of intrest (स्वरस्थ अभिव्यक्ती ) मागविणे करीता मा.महासभेची मान्यता मिळणे बाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,उपरोक्त विषयाबाबतअहवाल सादर करण्यात येतो की, मनपा हद्दीमधील रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी बाबत मनपा मार्फत सन २०१९-२०२० ते सन २०२४-२०२५ पर्यत खालील प्रमाणे प्रत्यक्ष वसुल करण्यात आलेला आहे.

| अ.क्र | सन | प्रत्यक्ष वसुली रक्कम |
|---|---|---|
| १ | २०१९-२०२० | १८७२९५०/- |
| २ | २०२०-२०२१ | ३७४११०/- |
| ३ | २०२१-२०२२ | ५६७१९०/- |
| ४ | २०२२-२०२३ | १११२१६०/- |
| ५ | २०२३-२०२४- | १३४४९८०/- |
| ६ | २०२४-२०२५ अखेर | ७५३९१०/- |

सन२०२०-२०२१ मध्ये मनपा मार्फत खाजगी करणाच्या माध्यमातुन रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी बाबत निविदा मागविण्यात आलेली होती व त्यामध्ये खालील प्रमाणे दर प्राप्त झाले होते.

सन २०२०-२०२१

प्राप्त दर ४३,५६,०००/- प्रतिवर्ष

सदरकामी नियुक्त केलेल्या खाजगी ठेकेदारामार्फत प्रत्ययक्षात रू,६,९०,८५५/- इतकी रक्कम जमा झाली आहे.तद्नंतर मनपा मार्फत सदर ठेकेदारावर नियमानुसार करवाई करून ठेका रद्द करण्यात आला.

सद्यस्थितीत मनपा मार्केट विभागाकडे रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी वसुली करीता केवळ ५ कर्मचारी उपलब्ध आहेत व सदरचे कर्मचारी संख्या पुरेशी नसल्यामुळे १००% वसुल करणे शक्य होत नाही.

मार्केट विभागामार्फत यापुर्वी खालील प्रमाणे तक्त्यामध्ये नमुद नुसार रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी वसुली बाबत ई - निविदा ५ वेळेस मागविण्यात आलेली होती.त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदा क्र. | प्राप्त निविदा | शेरा |
|---|---|---|---|
| १ | ANMC -९४८१८०-१ दि.२६-०९-२०२३ | २ | तांत्रिक लिफाफातील कागदपत्रे यथायोग्य सादर न केल्याने फेर निविदा काढण्यात आली |
| २ | ANMC -९५९९३४-१ दि.०३/११/२०२३ | २ | तांत्रिक लिफाफातील कागदपत्रे यथायोग्य सादर न केल्याने फेर निविदा काढण्यात आली |
| ३ | ANMC -१००४११५-१ दि.१३/०२/२०२४ | २ | तांत्रिक लिफाफातील कागदपत्रे यथायोग्य सादर न केल्याने फेर निविदा काढण्यात आली |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | ANMC -१०८१६२३-१<br>दि.०६/०९/२०२४ | २ | तांत्रिक लिफाफातील कागदपत्रे यथायोग्य सादर न केल्याने फेर निविदा काढण्यात आली |
| ५ | ANMC -१११९७२५-१<br>दि.१०/१०/२०२४ | २ | तांत्रिक लिफाफातील कागदपत्रे यथायोग्य सादर न केल्याने फेर निविदा काढण्यात आली |

मनपास खाजगी करणाच्या माध्यमातुन रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी ५२,२७,२००/- इतकी किमान अंदाजीत रक्कम उत्पन्न अपेक्षित आहे. वरील प्राप्त निविदांमध्ये मनपास अभिप्रित असलेली रक्कम निविदाधारकांनी निविदेमध्ये नमुद न केल्यामुळे अंतिमः मागविण्यात आलेली निविदा क्र ANMC -१११९७२५-१ दि.१०/१०/२०२४ रद्द करणे आवश्यक आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी दि.०४/०३/२०२५ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीमध्ये महानगरपालिका हद्दीतील रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी करीता expression of intrest (स्वारस्य अभिव्यक्ती ) मागविल्यास स्पर्धात्मक दृष्या महानगरपालिकेच्या प्रस्तावास योग्य प्रतिसाद मिळेल व रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी यामध्ये होणा-या वसुली मुळे प्रतिवर्ष उत्पन्नात वाढ होईल.मार्केट विभागामार्फत अंतिमः मागविण्यात आलेली निविदा क्र ANMC -१११९७२५-१ दि.१०/१०/२०२४ रद्द करण्यास तसेच रस्ता मांडणी फी व स्लॉटर फी ची संपुर्ण शहराकरिता एकत्रित निविदा न मागविता झोन क्र.१, झोन क्र.२ व झोन क्र.३ व झोन क्र.४ करीता स्वतंत्र्य एजन्सीची नियुक्ती करिता प्रभाग निहाय स्वतंत्र्य ई - निविदा मागविण्यस व सदर ई- निविदेमध्ये बेस प्राईज न देता इच्छुक निविदाधारकांकडुन expression of intrest (स्वारस्य अभिव्यक्ती ) मागविण्यास प्रस्तावातील मसुदयास व नमुद अटी,शर्ती नुसार निविदा प्रसिध्द करण्यास मा.प्रशासक महासभा यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१३६** **दिनांक : १८/०३/२०२५**

**विभाग** : सार्व.बांधकाम विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना (सन २०२४-२५) अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील इंदिरानगर झोपडपट्टी येथील डी.पी.रस्ता विकसीत करणे.या कामाकरीता मा.जिल्हाधिकारी (न.पा.शाखा) अहिल्यानगर यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेस मा.महासभेची मान्यता मिळणे बाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, साहित्यरत्न लोकशाही अण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना (सन २०२४-२५) अंतर्गत प्रभाग क्र.११ मधील इंदीरानगर झोपडपट्टी येथील डी.पी.रस्ता विकसीत करणे या कामाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेबाबत मा.आ.श्री.संग्राम अरूणकाका जगताप,विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य यांनी इकडेस पत्राव्दारे कळविले आहे.

सदर ठिकाणची यापुर्वी दि.३१/०१/२०२४ राजी मा.पाहणी समितीने पाहणी केलेली आहे. प्रस्तावित रस्ता सदर रस्त्याचाच भाग आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून रक्कम रू.२,७९,४०,९७३/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | प्रवर्ग | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.११ मधील इंदिरानगर झोपडपट्टी येथील डी.पी.रस्ता विकसीत करणे | अनुसुचित जाजी (महिला) | २,७९,४०,९७३/- |
| | | एकुण | २,७९,४०,९७३/- |

शासन निर्णय क्र.विघयो-१०२०००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि-४ दि.५ मार्च २००२ नुसार विकास कामे घेणेबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे.

**बाब क्र.४-** योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसुचित जाती तसेच नवबौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसुचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसुचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे,अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नमुद केलेली नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील.

**बाब क्र.५-** शहरातील अनुसूचित जाती व नवबौध्द यांचेसाठी आरक्षित प्रभाग तसेच अनुसुचित जाती व नवबौध्द नागरीकांचे प्रमाण येथे तुलनेत अधिक असेल तेथे प्राधान्याने (उतरत्या क्रमाने) या योजनेअंतर्गतची कामे हाती घेण्यात यावीत.

**बाब क्र.६ अ** - योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेली कामे -रस्ते,पोच रस्त,जोड रस्ते,रस्त्यांचे डांबरीकरण ,सिमेंट्रीकरण (अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतील वस्त्यांकरीता कच्चे रस्ते ) ,नाले बांधकाम,नाल्यावर फरशी बांधणे, विहीर दुरूस्ती तसेच उघडया विहीरींवर कठडे बांधणे,नदीच्या काठावर अथवा डोंगर उतारावर

संरक्षक भिंती तसेच कठडे बांधणे, छोटे पुल ,पिण्याच्या पाण्यासाठी, सोई - सुविधा (हापसा,पाण्याची टाकी) सार्वजनिक उपयोगासाठी मुता-या व शौचालय बांधणे,रस्त्यावरील विजेचे दिवे ,बालवाडी ,बगीचे,बगीच्यामध्ये पक्क्या स्वरूपाचे बसावयाचे खेळाचे साहित्य,समाज मंदिर,वाचनालय,व्यायासशाळा,दवाखाने,सांस्कृतीक केंद्र ,दुकाने ,स्मशानभुमीचा विकास ही व यासारखी सार्वजनिक हिताची अन्य कामे हाती घेता येतील.

**बाब क्र.६ ब -** या योजनेअंतर्गत कामे हाती घेतांना "पायाभूत सेवा सुविधाच्या " कामांचा प्राधान्य असणे आवश्यक राहील.

**बाब क्र. ६ क -** शहराच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार अनुज्ञेय असलेली विकास योजनेअंतर्गत कामे हाती घेता येतील.

सदर योजनेअंतर्गत प्रभाग क्र.८ अ हा प्रभाग अनुसुचित जाती (महिला ) प्रवर्गातील आहे. सदर ठिकाणी ५०% पेक्षा जास्त लोकसंख्या असलेने आवश्यकतेनुसार कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत. सदर प्रस्तावित कामाबाबत पाहणी समितीचा अहवाल सोबत जोडला आहे.

उक्त योजनेअंतर्गत वर नमुद विकास काम करणेसाठी रक्कम रू. २,७९,४०,९७३/- (अक्षरी रक्कम रू.दोन कोटी एकोऐंशी लक्ष चाळीस हजार नउशे त्र्याहत्तर मात्र) चा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, (न.पा.शाखा ) अहिल्यानगर यांचेकडेस सादर करणेस मा.प्रशासक महासभा यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका, |

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१३७** **दिनांक : १८/०३/२०२५**
**विभाग** : अर्थ विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार- अ चे अधिसुचना अन्वये अविवाहीत मुलीच्या कुटुंबनिवृत्तीवेतन बाबतची सुधारीत नियम लागु करण्याबाबत.

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,अहिल्यानगर महानगरपालिकेमध्ये महाराट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन ) नियम १९८२ नियमानुसार निवृत्तीवेतन व तत्सम कार्यपध्दती अवलंबण्यात येते.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन ) नियम १९८२ मधील नियम ११६ मधील पोटनियम (५) मध्ये खंड (तीन ) मध्ये "अविवाहीत मुलीच्या बाबतीत ती चोवीस वर्ष पुर्ण होईपर्यत किंवा तिचा विवाह होईपर्यत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यत " अशी तरतुद होती.तथापी उपरोक्त विषयांकीत परिपत्रकानुसर त्यामध्ये पुढीलप्रमाणे दुरूस्ती करण्यात आलेली आहे.

अविवाहीत घटस्फोटीत किंवा अ विधवा मुलीच्या बाबतीत मुलीला २४ वर्षे वय पुर्ण झाल्यानंतर हयातभर, तिचा / पुर्नविवाह होईपर्यत किंवा तिने उपजिविकेची सुरूवात करेपर्यत या पैकी जे अगोदर घडेल तो पर्यत पुढील अटीच्या अधिन राहून कुटुंब निवृत्तीवेतन मंजूर करण्यात येईल.

१.शासकीय कर्मचारी ज्यावेळी सेवानिवृत्त होईल त्यावेळी त्याच्या मुळ निवृत्तीवेतन प्रकरणामध्ये त्याच्या अन्य पात्र कुटुंबनिवृत्तीवेतनधारक, वारसदारांसह प्रदान आदेशामध्ये त्याच्या अविवाहीत,घटस्फोटीत किंवा विधवा मुलीच्या नावाचा समावेश करण्यात यावा. कार्यालय प्रमुखाने शासकीय कर्मचा-याचे निवृत्तीवेतनाचे प्रकरण तयार करताना नमुना ३ मध्ये कुटुंबाचा तपशिल , अपत्याचा जन्म दाखला तसेच इतर आवश्यक कागदपत्रांसह निवृत्तीवेतन प्रकरण महालेखापाल कार्यालयाकडे मंजुरीकरीता पाठवावे.

२.विधवा मुलीच्या बाबतीत, तिच्या पतीचा मृत्यु आणि घटस्फोटीत मुलीच्या बाबतीत कायादेशीर घटस्फोट ,शासकीय कर्मचा-याच्या किंवा निवृत्तीवेतनधारकाच्या किंवा त्याच्या किंवा तिच्या जोडीदाराच्या हयातीत झाला असणे आवश्यक आहे.तसेच घटस्फोटाची कार्यवाही ,शासकीय कर्मचा-याच्या किंवा निवृत्तीवेतनधारकाच्या कुटुंब निवृत्तीवेतनधारकाच्या हयातीत सक्षम न्यायालयात दाखल केली असेत, परंतु त्यांच्या मृत्युनंतर घटस्फोट झाला असेल तर घटस्फोटीत मुलीला घटस्फोटाच्या दिनांकापासून कुटुंबनिवृत्तीवेतन प्रदेय ठरेल.

३.जे निवृत्तीवेतनधारक / कुटुंब निवृत्तीवेतनधारक अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई जिल्हा कोषागार कार्यालयातुन निवृत्तीवेतन /कुटुंबनिवृत्तीवेतन घेत होते आणि मृत झालेले आहेत. त्यांच्या अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटीत मुलीस कुटुंबनिवृत्तीवेतन अनुज्ञेय होण्यासाठी निवृत्तीवेतनधारक ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त किंवा मृत झालेले आहेत त्या कार्यालयामार्फत कुटुंबनिवृत्तीवेतनाचा प्रस्ताव नमुना १२ मध्ये तपशील भरून निवृत्तीवेतन / कुटुंब निवृत्तीवेतनधारकाचे मृत्यु प्रमाणपत्र इतर भावडांचे ना- हरकत प्रमाणपत्र आणि कुटुंबनिवृत्तीवेतन देय असलेल्या मुलीचे आधार कार्ड, पॅन कार्ड,बॅक पासबुकचे प्रथम पृष्ठ, शिधापत्रीका इत्यादीच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रतीसह / कुटुंब निवृत्तीवेतन प्रकरण मंजूरी करिता महालेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यात यावे. सदर प्रकरण अर्जदाराने परिपुर्ण अर्ज व अन्य सहपत्रक सादर केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या १५ दिवसांच्या आत महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी संबधित कार्यालय प्रमुखाची राहील.

४.महालेखापाल कार्यालयाने मृत झालेल्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंबनिवृत्तिवेतनधारकाचे निवृत्तिवेतन प्रदान आदेश (PPO) ची मागणी संबधित अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई अथवा जिल्हा कोषागार कार्यालय यांच्याकडे करावी. अधिदान व लेखा कार्यालय मुंबई व जिल्हा कोषागार कार्यालय यांनी त्यांच्याकडील निवृत्तिवेतन प्रदान आदेश (PPO) अंतिम निवृत्तिवेतन प्रमाणपत्र नोंदवुन महालेखापाल कार्यालयास परत करावे. महालेखापाल कार्यालयाने जुने निवृत्तिवेतन प्रदान आदेश (PPO) रद्द करून सुधारीत निवृत्तिवेतन प्रदान आदेश (PPO) मंजूर करण्याची कार्यवाही करावी.

५.शासकीय कर्मचा-यांच्या दोन किंवा अधिक अपत्यापैकी एक असेल तर शेवटचे अज्ञान अपत्य यथास्थिती २१ किंवा २४ वर्ष वयाचे होईपर्यत कुटुंब निवृत्तीवेतन प्रथमत:अज्ञाने अपत्यांना प्रदान हेईल आणि कुटुंबनिवृत्तीवेतन मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारिरिकदृष्टया पांगळेपणा किंवा विकलांगता आणि असलेल्या अपत्यास प्रथम कुटुंबनिवृत्तिवेतन मंजूर करण्यात येईल जेव्हा मोठे असलेले अपत्य अपात्र होईल.त्यानंतर त्याच्या पुढील लहान अपत्यास कुटुंबनिवृत्तीवेतन देय ठरेल.

६.मृत शासकीय कर्मचा-याच्या किंवा निवृत्तिवेतनाधारकाच्या मागे मानसिक दुर्बिलता असलेली किंवा शारिरिकदृष्टया पांगळेपण किंवा विकलांगता असलेली एकापेक्षा जास्त अपत्ये असतील अशा प्रकरणी त्यांच्या जन्मक्रमानुसार कुटुंबनिवृत्तीवेतन मंजूर करण्यात येईल.

७.मृत शासकीय कर्मचा-याच्या किंवा कुटुंबनिवृत्तिवेतनधारकाच्या मागे २४ वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या एकापेक्षा जास्ता अविवाहीत किंवा विधवा किंवा घटस्फोटित मुली असतील अशा प्रकरणी त्यांचया जन्मक्रमानुसार कंटुंबनिवृत्तिवेतन मंजूर करण्यात येईल.

८.शासकीय कर्मचा-याच्या किंवा निवृत्तिवेतनधारकांच्या /कुटुंबनिवत्तिवेतनधारकाच्या हयातीत मृत्युपूर्वीच अपत्यास मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारिरिकदृष्टया पांगळेपण किंवा विकलांगता अस्तीत्वात असणे आवश्यक आहे.

९.शासकीय कर्मचारी निवृत्तिवेतनधारक किंवा कुटुंबनिवृत्तीवेतनधारक हयात असताना अविवाहीत किंवा विधवा किंवा घटस्फोटीत मुलगी तिच्या पालकावर किंवा पालकांवर अवलंबून असणे आवश्यक आसून शासकीय कर्मचारी निवृत्तिवेतनधारक किंवा कुटुंबनिवृत्तिवेतनधारक हयात असताना त्यांच्यावर अवलंबून असल्याबाबचे समुचित मुद्रांक पत्रावर साक्षांकीत (Notarised) केलेले मुळ स्व-घोषणापत्र,संबधित मुलीचे वास्तव्य असलेल्या जिल्हयातील जिल्हाधिकारी /तहसिलदार कार्यालयातील सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले सर्व मार्गानी मिळणारे एकुण कौटुंबिक मासिक उत्पन्न (रू ७५०० + प्रचलित महागाई भत्ता) यापेक्षा जास्त नसल्याचा उत्पन्नाचा दाखला निवृत्तिवेतन प्रकरण मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर नमुन्यासोबत कुटुंब निवृत्तवेतन प्रकरण सादर करताना देणे आवश्यक आहे.

१०.महालेखापाल कार्यालयाकडून निवृत्तिवेतन प्रकरण मंजूर झाल्यानंतर प्रदान सरूवात झाल्यानंतर या प्रकरणी जिल्हाधिकारी /तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला,हयातीचा दाखला प्रतिवर्षी माहे नोव्हेंबर अखेर तसेच पुर्नविवाह न केल्याबाबतचे व उपजिविकेची सुरूवात न केल्याबाबतचे स्व-घोषणापत्र प्रतिमाह अधिदान व लेखा कार्यालय,मुंबई /जिल्हा कोषागार कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

११.अविवाहीत किंवा विधवा किंवा घटस्फोटीत मुलीने पुनर्विवाह किंवा तिने उपजिविकेची सुरूवात केल्यास याबाबत तिने स्वतः कुटुंब निवृत्तिवेतन घेत असलेल्या सबंधित जिल्हा कोषागार कार्यालयास / उपकोषागार कार्यालयास तात्काळ कळविणे आवश्यक आहे.

१२.ज्या कुटुंबनिवृत्तिवेतनधारक अविवाहीत किंवा विधवा किंवा घटस्फोटीत मुलीला अधिसुचनेच्या दिनांकापासुन म्हणजे दि.०८/०२/२०२४ पासून कुटुंबनिवृत्तिवेतन अनुज्ञेय राहील. तथापी त्यांना दि.०८/०२/२०२४ पूर्वीची थकबाकी अनुज्ञेय राहाणार नाही. दि.०८/०२/२०२४ ते कुटुंबनिवृत्तिवेतन प्रत्यक्ष अदा करे पर्यतच्या कालावधीची थकबाकी अनुज्ञेय राहील.

वरील शासन अधिसुचना व शासन परिपत्रकानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम १९८२ मधील नियम ११६ मधील केलेली दुरूस्तीनुसार सदस्थितील निवृत्तिवेतनासाठी मागील ३ ते ८ वर्षेपुर्वीचे मयत झालेल्या निवृत्तिवेतनधारकांच्या अविवाहीत मुलीचे अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

निवृत्तिवेतनधारकांच्या अविवाहीत मुलींना दि.०८/०२/२०२४ पासून कुटुंबनिवृत्तिवेतन लागु करणेस मा.प्रशासक महासभा यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ४० विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.१३८** **दिनांक : १८/०३/२०२५**
**विभाग** : घनकचरा व्यवस्थापन विभाग

---

**प्रस्तावाचा विषय :-** मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट,पुणे यांची देयकातील कपात करण्यात आलेली अनामत रक्कम अदा करणेस मा.महासभेची मान्यता मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट,पुणे यांचे देयकातील कपात करण्यात आलेल्या अनामत रक्कमा नोव्हेंबर २०१९ ते फेब्रुवारी २०२१ अखेर रक्कम रू.२३,९८,८८८/- व्यापगत झालेली आहे. सदर रक्कम महाराष्ट्र शासन लेखासंहिता २०११ मधील प्रकरण १० नियम १६८ नुसार तीन वर्षापेक्षा जास्त मुदतीत मागणी न केलेल्या रकमा प्रत्येक आर्थिक वर्षा अखेर महानगरपालिकेकडे व्यपगत ठेवीमध्ये जमा होतात. सदरच्या ठेवी परत करणे करणेकरीता मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट,पुणे यांची देयकातील मार्च २०२१ ते माहे जानेवारी २०२३ या कालावधीमध्ये व्यापगत झालेली अनामत रक्कम रूपये रू.२३,९८,८८८/- अदा करणेस मा.प्रशासक महासभा यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णय :-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ /नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,